# समासाः।

जेव्हा दोन शब्द एकत्र येतात तेव्हा संधी होतो, परंतु जेव्हा ते दोन शब्द एकमेकांवर अवलंबून असतात तेव्हा 'समास' होतो.

| | | |
|---|---|---|
| खलु + अयम् | खल्वयम्। | संधी |
| सूर्यस्य + उदयः | सूर्यस्योदयः। | संधी |
| सूर्यस्य उदयः | सूर्योदयः। | समास |
| नृपस्य कन्या | नृपकन्या। | समास |

**समासात –**

१. विभक्ती प्रत्ययांचा लोप होतो.

२. सामासिक पदात आवश्यक तेथे संधी केला जातो.

३. समासात कमीत कमी दोन शब्द आवश्यक असतात.

४. पहिल्या पदास पूर्वपद.
दुसऱ्या पदास उत्तरपद म्हणतात.

पदांना दिलेल्या प्राधान्यामुळे समासांचे खालीलप्रमाणे प्रकार पडतात.

| पूर्वपद | उत्तरपद | प्रकार |
|---|---|---|
| ✓ | × | अव्ययीभाव |
| × | ✓ | ततुरुष |
| ✓ | ✓ | द्वन्द्व |
| × | × | बहुव्रीहि |

**समासाचा विग्रह –**

विग्रह म्हणजे समासाचे स्पष्टीकरण असते. तो समासाचा अर्थ स्पष्ट करतो. प्रत्येक समास प्रथमेत सोडविला जातो, दिलेला समास इतर विभक्तीत असेल, तर त्याला 'तद्' सर्वनामाचा आपण विस्तार देतो.

## अव्ययीभाव:समासः।

(व्यय = बदल
अव्यय = बदल नाही)

**वर्णनः**

| | |
|---|---|
| पूर्वपद = | प्रति, यथा, अनु इ. यांसारखी अव्यये |
| उत्तरपद = | नेहमीच एखाद्याचे नाम |
| नेहमी प्रथमा एकवचनात | |
| क्रियापदाविषयी अधिक माहिती देते. | |

**विग्रहः**

| | |
|---|---|
| अव्ययाच्या अर्थाप्रमाणे पूर्वपद विग्रहात कधीच दिसत नाही. | |
| प्रति | प्रत्येक (बहुधा सप्तमी) |
| यथा | च्या प्रमाणे (द्वितीयेत दाखविले जाते) |

उदाहरणे

| | | | |
|---|---|---|---|
| * प्रतिदिनम् | - | दिने दिने। | (प्रत्येक दिवशी) |
| * यथाकालम् | - | कालम् अनुसृत्य। / कालम् अनतिक्रम्य। | (वेळेनुसार)<br>(वेळेची मर्यादा न ओलांडता) |
| * यथाशक्ति | - | शक्तिम् अनुसृत्य। / शक्तिम् अनतिक्रम्य। | (क्षमतेनुसार)<br>(स्वक्षमेतची मर्यादा न ओलांडता) |

## द्वन्द्वःसमासः।

- द्वन्द्वः समासः।
  - अ. इतरेतर-द्वन्द्वः
  - ब. समाहार-द्वन्द्वः

### अ. इतरेतर-द्वन्द्वः।

**वर्णन** –

इतर + इतर – दोन वेगवेगळ्या गोष्टी एकत्र येतात.

द्वन्द्व हा दोन/अधिकांचा समूह असतो.

दोन्ही पदे महत्त्वाची असतात.

हा समास कधीच एकवचनी असू शकत नाही

हा नेहमी द्विवचनी/ बहुवचनी असतो.

उत्तरपद समासाचे लिंग ठरवते.

**विग्रह** –

प्रत्येक पद प्रथमेत असते.

'च' या अव्ययाने पदे जोडली जातात.

प्रत्येक शब्दाला स्वतःचे निश्चित लिंग असते.

संख्येवर वचन अवलंबून असते.

∵ केवळ नाम ⟶ एकवचनी (उदा. रामः कृष्ण)

∵ एकत्रित नाम ⟶ एकवचनी (उदा. अन्नम्, जलम्)

∵ मोठ्या प्रमाणातील वस्तू ⟶ बहुवचनी (लोकाः, वस्त्राणि)

**उदाहरणे** –

१. रामकृष्णौ – रामः च कृष्णः च। (राम आणि कृष्ण)

कृष्णः – उत्तरपद

– ते पुंलिंगी आहे.

∴ कृष्ण पदामुळे समासाचे लिंग – पुंलिंग. राम व कृष्ण एक-एक

∴ रामकृष्णौ – प्रथमा द्विववचन

२. सीतागीते – सीता च गीता च। (सीता आणि गीता)

हा स्त्रीलिंगी समास आहे.

३. रामलक्ष्मणभरतशत्रुघ्नानाम् – (राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न)

समास प्रथम प्रथमा विभक्तीत सोडवावा.

रामः च लक्ष्मणः च भरतः च शत्रुघ्नः च, तेषाम्।

विचारलेला समास षष्ठी बहुवचनात आहे.

∴ तद् – चे षष्ठी बहुवचन – तेषाम् चा विस्तार दयावा.

४. नृत्यगीतवादनैः –

नृत्यं च गीतं च वादनं च, तैः। (नाच, गाणे, वाद्यवादन – त्यांनी)

५. देशविदेशेभ्यः – देशाः च विदेशाः च, तेभ्यः। (देश आणि परदेश, त्यांपासून)

६. शृङ्गारवीरकरुणाद्भुतहास्यभयानकाः –

शृङ्गारः च वीरः च करुणः च अद्भुतः च हास्यम् च भयानकः च।

(शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य आणि भयानक)

७. पत्रपुष्पफलानि –

पत्राणि च पुष्पाणि च फलानि च। (पाने, फुले आणि फळे)

८. चन्द्रार्कताराः –

चन्द्रः च अर्कः च ताराः च। (चन्द्र, सूर्य आणि तारका)

९. छायातपौ –

छाया च आतपः च। (सावली आणि ऊन)

१०. सुखदुःखयोः – (सुख आणि दुःख, त्यांचे)

सुखं च दुःखं च, तयोः।

## ब. समाहार-द्वन्द्वः।

**वर्णन –**

समाहार म्हणजे समूह अथवा गण
जन्मजात शत्रू, कृमिकीटक, साधने, शरीरावयव, सैन्यदल इत्यादींचा समाहार द्वन्द्व समास होतो.
हा नित्य नपुंसकलिंगी प्रथमा एकवचनी असतो.

**विग्रह –**

यात प्रथमेतील दोन पदे असतात.
प्रत्येक पदानंतर 'च' अव्यय घालावे..
समूहातील पदांच्या द्विवचनासाठी एतयोः समाहारः बहुवचनासाठी लिंगाप्रमाणे एतेषां / एतासां समाहारः अशी षष्ठी विभक्ती योजावी.

**उदाहरण –**

१. अहिनकुलम् – अहिः च नकुलः च एतयोः समाहारः। (साप आणि मुंगुस यांचा समूह)

२. पाणिपादम् – पाणी च पादौ च एतेषां समाहारः। (दोन हात व दोन पाय यांचा समूह)

## तत्पुरुषः समासः।

**तत्पुरुषः**

- विभक्ति-तत्पुरुषः
- उपपद-तत्पुरुषः
- प्रादि-उपपद-तत्पुरुषः
- नञ्-तत्पुरुषः
- अलुक्-तत्पुरुषः

## अ. विभक्ति-तत्पुरुषः।

**वर्णनः**

- विभक्ति – विग्रहात पूर्वपदाची जी विभक्ती योजतात, त्याचे नाव तत्पुरुष समासात दिले जाते.
- तत्पुरुष हा समास उत्तरपदप्रधान आहे. ∴ उत्तरपद महत्त्वाचे

| | प्रकार | विग्रह | | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| | | **पूर्वपद** | **उत्तरपद** | |
| १. | **द्वितीया** तत्पुरुष | द्वितीया | प्रथमा | भूमिं गतः भूमिगतः। (जमिनीत गेलेला) |
| २. | **तृतीया** तत्पुरुष | तृतीया | प्रथमा | तुम्बीफलेन विकलः तुम्बीफलविकलः। (भोपळ्याशिवाय) |
| ३. | **चतुर्थी** तत्पुरुष | चतुर्थी | प्रथमा | सहकार्याय इति सहकार्यार्थम्। (सहकार्यासाठी) |
| ४. | **पञ्चमी** तत्पुरुष | पञ्चमी | प्रथमा | मरणात् मुक्तः। मरणमुक्तः। (मरणापासून मुक्त) |
| ५. | **षष्ठी** तत्पुरुष | षष्ठी | प्रथमा | सूर्यस्य प्रकाशः सूर्यप्रकाशः। (सूर्याचा प्रकाश) |
| ६. | **सप्तमी** तत्पुरुष | सप्तमी | प्रथमा | उद्योगे व्यग्रः उद्योगव्यग्रः। (उद्योगात व्यग्र) |

विभक्ति तत्पुरुषात उत्तरपदी येणारे शब्द.

| | |
|---|---|
| द्वितीया तत्पुरुष | श्रित, आश्रित, गत, आप्त, आपन्न |
| तृतीया तत्पुरुष | हीन, रहित, विहीन, विकल, आढ्य, संपन्न, मिश्र, युक्त |
| चतुर्थी तत्पुरुष | अर्थम्, हेतू / कारण |
| पञ्चमी तत्पुरुष | भीत, मुक्त, रक्षित, पतित (च्यापासून पडलेला) भयम्, निर्मितिः भीतिः |
| षष्ठी तत्पुरुष | संबंधवाचक कोणतेही शब्द (चा) |
| सप्तमी तत्पुरुष | रत, व्यग्र, निपुण, कुशल, चतुर, ख्यात, प्रसिद्ध, पतित (च्या वर पडलेला), प्राज्ञ, प्रवीण, तज्ज्ञ, पटु, पारङ्गत, शूर |

प्रथमा तत्पुरुषात दोन्ही पदे प्रथमेत असतात म्हणून त्यास कर्मधारय असे म्हणतात, आपण त्याची नंतर चर्चा करणार आहोत.

## ब. उपपद-तत्पुरुषः

**वर्णनः**

| | |
|---|---|
| पूर्वपद | नाम / कर्म / अधिकरण |
| उत्तरपद | क्रियापद सूचित करणारे छोटेसे रूप (कृदन्त) |

**विग्रह :**

| | |
|---|---|
| पूर्वपद | क्रियेचे कर्म – द्वितीया<br>अधिकरण – सप्तमी |
| उत्तरपद | कृदन्तातील धातूचे वर्तमानकालवाचक तृतीय पुरुष एकवचन् रूप |

| (कृदन्त) | क्रियापद |
|---|---|
| द | यच्छति / ददाति। |
| क / कार / कर | करोति / कुरुते। |
| ज्ञ | जानाति। |
| स्थ | तिष्ठति। |
| प | पाति। (रक्षण करणे) |
| प | पिबति। (पिणे) |
| लभ | लभते। |
| नी | नयते-नयति। |
| ग / गम / गामी | गच्छति। |
| ज | जायते। |
| वासी | वसति। |
| वह / वाह | वहति। |
| धर / धार | धारयति-धारयते। |
| घ्न | हन्ति। |
| जीवी / जीव | जीवति। |
| जय | जयति। |

## क. प्रादि-उपपद-तत्पुरुषः।

**वर्णन:**

| | |
|---|---|
| पूर्वपद | प्रादि (उपसर्ग)<br>दुर्, सु |
| उत्तरपद | (कृदन्त) |

**विग्रह:**

| | |
|---|---|
| बहुधा कर्मणि प्रयोगात विग्रह केला जातो. | |
| उत्तरपद | कृदन्ताचे योग्य क्रियापद. |
| पूर्वपद | उपसर्गाने तयार होणारे नाम – तृतीयेत |
| | दुर् – दुःखेन, सु-सुखेन |

**उदाहरणे:**

| | | |
|---|---|---|
| दुर्लभः | दुःखेन लभ्यते इति। | (कष्टाने प्राप्त होते ते) |
| सुलभः | सुखेन लभ्यते इति। | (सुखाने प्राप्त होते ते) |
| दुर्गमः | दुःखेन गम्यते इति। | (कष्टपूर्वक जाते ते) |
| सुगमः | सुखेन गम्यते इति। | (सुखाने जाते ते) |

## ङ. नञ्-तत्पुरुषः।

**वर्णनः**

| | |
|---|---|
| पूर्वपद | अ / अन् |
| उत्तरपद | नाम / विशेषण |

**विग्रहः**

| | |
|---|---|
| पूर्वपद | न |
| उत्तरपद | नाम / विशेषण |

## इ. अलुक्-तत्पुरुषः।

**वर्णन :**

| | |
|---|---|
| अलुक् – समासातील पूर्वपदाचा विभक्तिप्रत्ययांचा लोप होत नाही. | |
| पूर्वपद | विभक्ति प्रत्ययासह (समासात दिल्याप्रमाणे) |
| उत्तरपद | नाम |

**विग्रहः**


| | |
|---|---|
| पूर्वपद | समासात दिल्याप्रमाणे |
| उत्तरपद | प्रथमा विभक्ती |

## कर्मधारय:समासः।

प्रथमा तत्पुरुषः = कर्मधारयः समासः।

**वर्णन :**

| | |
|---|---|
| पूर्वपद | प्रथमा |
| उत्तरपद | प्रथमा |



## अ. विशेषण – विशेष्य-कर्मधारयः।

i. विशेषण-पूर्वपद-कर्मधारयः।

**वर्णन :**

| | |
|---|---|
| पूर्वपद | विशेषण |
| उत्तरपद | नाम |

**विग्रह :**

| | |
|---|---|
| पूर्वपद | नामाप्रमाणे विशेषणाचे लिंग, विभक्ती, वचन |
| उत्तरपद | प्रथमा विभक्ती |

ii. विशेषण-उत्तरपद-कर्मधारयः।

**वर्णन :**

| | |
|---|---|
| पूर्वपद | नाम |
| उत्तरपद | विशेषण |

**विग्रह :**

| | |
|---|---|
| पूर्वपद | नामाप्रमाणे विशेषणाचे लिंग, विभक्ती, वचन. |
| उत्तरपद | स्वतःच्या लिंग, वचन, विभक्तीसह नाम प्रथमेत |

iii. विशेषण-उभयपद-कर्मधारयः।

**वर्णन :**

| | |
|---|---|
| पूर्वपद | विशेषण |
| उत्तरपद | विशेषण |
| दोन्ही विशेषणे एकाच व्यक्तीचे वर्णन करतात. | |

**विग्रह :**

इतरेतर द्वन्द्वाप्रमाणे याच्या विग्रहातही 'च' अव्यय वापरले जाते परंतु विग्रहात 'असौ' हे सर्वनाम वापरतात. विग्रहातील 'असौ' हे सर्वनाम दोन्ही विशेषणे एकाच व्यक्तीची आहेत, हे सूचित करते.
येथे दोन्ही विशेषणे एकाच व्यक्तीचे वर्णन करतात.

iv. अन्यपदार्थदर्शक-कर्मधारयः।

**वर्णन :**

| | |
|---|---|
| नित्य नपुंसकलिंगी प्रथमा एकवचनी. | |
| पूर्वपद | नाम |
| उत्तरपद | अन्तरम् |

**विग्रह :**

विग्रहात पहिल्या स्थानी 'अन्तर' शब्दाऐवजी 'अन्यत्' या विशेषणाचे योग्य रूप वापरावे.

## ब. विशेषनाम – सामान्यनाम-कर्मधारय: ।

विशेष नाम – सामान्य नाम

**वर्णन :**

| | |
|---|---|
| पूर्वपद | विशेष नाम |
| उत्तरपद | सामान्य नाम |

**विग्रह :**

| | |
|---|---|
| पूर्वपद | स्वत:चे लिंग राखून प्रथमेत |
| उत्तरपद | स्वत:चे लिंग राखून प्रथमेत |
| दोन पदांमध्ये 'नाम' हे अव्यय वापरतात. | |

## क. उपमान-उपमेय-कर्मधारय: ।

### i. उपमान पूर्वपद कर्मधारय :

| | |
|---|---|
| उपमान | ज्याची उपमा दिली जाते ते |
| उपमेय | ज्याला उपमा दिली जाते ते |

***घनश्याम: – (कृष्ण:)**

घन – ढग

श्याम – काळा

कृष्णासाठी वापरलेले विशेषण

∴ उपमा देण्याची गोष्ट = कृष्ण.
त्याची ढगाशी तुलना केली आहे.

∴ तुलनेची प्रमाणित गोष्ट = ढग = घन.
कृष्ण आणि घन यांत सादृश्य काय? = काळा रंग = श्याम.

∴ घनश्याम: – घन: इव श्याम: । (ढगासारखा काळा)

| | |
|---|---|
| पूर्वपद | उपमान |
| उत्तरपद | उपमेय आणि उपमान साधर्म्यवाचक गुण |
| * समासात उपमेयाचा उल्लेख नसतो. | |

**ii. उपमान-उत्तरपद-कर्मधारयः।**

**ज्ञानदीपः –**

| | | |
|---|---|---|
| उपमान | ज्याची उपमा दिली जाते ते | दीप |
| उपमेय | ज्याला उपमा दिली जाते ते | ज्ञानम् |

येथे ज्ञानाला उपमा दिली जात आहे.

∴ ते उपमेय आहे.

ज्ञानाला दिव्याची उपमा दिली आहे.

∴ ते उपमान आहे.

| | |
|---|---|
| पूर्वपद | उपमेय |
| उत्तरपद | उपमान |
| साधर्म्यवाचक गुण उल्लेखलेला नाही. | |

∴ ज्ञानदीपः – ज्ञानं दीपः इव। (दिव्याप्रमाणे असलेले ज्ञान)

**iii. रूपक-कर्मधारयः।**

जेव्हा उपमान व उपमेय यांच्यात साम्य न दाखवता.अभेद दाखवला जातो, तेव्हा रूपक कर्मधारय होतो.

| | | |
|---|---|---|
| उपमान उत्तरपद कर्मधारय + | इव ऐवजी 'एव' चा वापर | = रूपक कर्मधारय |

| | |
|---|---|
| पूर्वपद | उपमेय |
| उत्तरपद | उपमान |
| एव – दोन्ही पदांच्या मध्ये – जोडताना वापरावे. | |

## ड. प्रादि-कर्मधारयः।

**वर्णन :**

| | |
|---|---|
| पूर्वपद | प्रादि – उपसर्ग |
| उत्तरपद | नाम |

**विग्रह :**

| पूर्वपद | उपसर्गाऐवजी खालील शब्द येतील |
|---|---|
| प्र ⟶ प्रगत | |
| वि ⟶ विशेष, विभिन्न, विशिष्ट | |
| सु ⟶ सुष्ठु (अव्यय) /शोभन (विशेषण) | |
| दुर् ⟶ दुष्ट/दुर्गत | |

## इ. मध्यमपदलोपी-कर्मधारयः।

**वर्णन :**

| | |
|---|---|
| पूर्वपद | नाम / विशेषण |
| उत्तरपद | नाम / विशेषण / भू.धा.वि |

**विग्रह :**

| |
|---|
| दोन पदे एकमेकांशी एखाद्या पदाने जोडली जातात. समासात मध्यमपदाचा लोप होतो. |
| मध्यमपद संदर्भ / अर्थानुसार अनुमानित केले जाते. |

## फ. द्विगु-समासः।

**वर्णन :**

नित्य नपुंसकलिंगी प्रथमा एकवचन / स्त्रीलिंगी प्रथमा एकवचन.
हा समूहवाचक शब्द असतो.(समाहार:)
पूर्वपद नेहमी संख्यावाचक विशेषण असते.

**विग्रह :**

प्रथम दोन पदांची षष्ठी बहुवचन
त्यानंतर 'समाहार:' असा शब्द

## बहुव्रीहि:समासः।

पूर्वपद व उत्तरपद यांतील कोणतेही पद महत्त्वाचे नसते.
समासात उल्लेख न केलेल्या वस्तू / व्यक्तीचा अर्थ दोन्ही पदांतून सूचित होतो.
संपूर्ण समास हा एक विशेषण असतो.
अन्य वस्तू / व्यक्तीचा निर्देश करण्यासाठी विग्रहात यद् / तद् या सर्वनामांची मदत घ्यावी लागते.
अन्य व्यक्ती / वस्तू तृतीय पुरुषी असल्याने विग्रहात तिचा उल्लेख स:/सा/ तद् (एकवचन) तौ/ते/ते (द्वि-व), ते/ता:/तानि (ब.व) करतात.
अन्य वस्तूच्या वर्णनात समासातील दोन पदांशी संबंध दाखवताना यद् च्या षष्ठीचा उपयोग करतात.

∴ यस्य / यस्या: (एव)
ययो: (द्विव)
येषाम् / यासाम् (ब.व)

जेव्हा पूर्वपदी धातुसाधित विशेषण असते, तेव्हा, 'यद्' ची तृतीया 'येन' वापरतात.

## अ. समानाधिकरण-बहुव्रीहि:।

नीलकण्ठ: –

| | |
|---|---|
| पूर्वपद | नील (निळा) |
| उत्तरपद | कण्ठ (गळा) |

नीलकण्ठ: 'निळा गळा' असा अर्थ नाही.

ज्याचा गळा निळा आहे अशी व्यक्ती

∴ नील: कण्ठ: यस्य स:। (शङ्कर:)
तो शंकर देव होय.
'नील' आणि 'कण्ठ' या पदांद्वारे तो प्रतीत होतो.

## ब. व्यधिकरण-बहुव्रीहि:।

**वर्णन :**

ईश्वरनिष्ठ:

| | |
|---|---|
| पूर्वपद | ईश्वर |
| उत्तरपद | निष्ठा |

ईश्वरनिष्ठ: याचा अर्थ केवळ ईश्वरावर निष्ठा असा नसून ईश्वरावर आहे निष्ठा ज्याची तो असा होतो. कारण समास पुंलिंगी आहे.

∴ ईश्वरे निष्ठा यस्य स:। (पुरुष:)

## क. प्रादि-बहुव्रीहिः।

**वर्णन :**

| | |
|---|---|
| पूर्वपद | प्रादि उपसर्ग |
| उत्तरपद | नाम |

**विग्रह :**

| | | |
|---|---|---|
| १. | वि – विगत | (निघून गेलेला) ⟶ यस्मात् |
| २. | निर् – निर्गत | (निघून गेलेला) ⟶ यस्मात् |
| ३. | दुर् – दुर्गत् / दुष्ट | (कष्टपूर्वक निघून गेलेला) ⟶ यस्य |
| ४. | सु – शोभन / सुष्ठु | (सुंदर/चांगले) ⟶ यस्य |
| ५. | कु – कुत्सित | (वाईट) ⟶ यस्य |

*** विग्रहात उत्तरपदाचे स्वतःचे लिंग, विभक्ती, वचन ठेवावे.**

पूर्वपद नेहमी विशेषण असते, म्हणून उत्तरपदाप्रमाणे त्याचे लिंग, विभक्ती, वचन ठेवावे.

विचारलेल्या समासाचे लिंग विभक्ती, वचन 'यद्', 'तद्' च्या योजलेल्या रूपांवरून सूचित होते.

## ड. नञ्-बहुव्रीहिः।

*जेव्हा उत्तरपदापुरता अर्थ मर्यादित असतो, तेव्हा नञ् तत्पुरुष होतो.

उदा. अस्वास्थ्यम् – न स्वास्थ्यम्।

*परंतु जेव्हा दोन्ही पदे दुसऱ्याच व्यक्तीचा उल्लेख करतात तेव्हा नञ् बहुव्रीहि होतो.

## इ. सह-बहुव्रीहिः।

**वर्णन :**

| | |
|---|---|
| पूर्वपद | स/सह |
| उत्तरपद | नाम |
| * संपूर्ण समास विशेषण असतो. | |

**विग्रह :**

उत्तरपदाची तृतीया करून त्यानंतर सह अव्यय योजतात.

## फ. क्रियाविशेषण-सह-बहुव्रीहिः।

**परिचयः**

* सुरुवात 'स' ने आणि अंत 'म्' ने होते.
* नित्य नपुंसकलिंगी प्रथमा एकवचन.
* विशेषणासारखा कधीच उपयोग होत नाही.
* नित्य क्रियाविशेषणासारखा उपयोग.
* संपूर्ण समास एखादी क्रिया व्यक्त करतो, म्हणून तो बहुव्रीही मानतात.

## उ. अलुक्-बहुव्रीहिः।

ज्या बहुव्रीहीत विभक्ती प्रत्ययांचा लोप होत नाही त्यास 'अलुक् बहुव्रीहि' असे म्हणतात.

**उदाहरणे :**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कण्ठेसर्पः | कण्ठे सर्पः यस्य सः। (शंकरः) | (ज्याच्या गळ्यात साप आहे असा – शंकर) |
| २. | त्वचिसारः | त्वचि सारः यस्य सः। (वंशः) | (ज्याच्या त्वचेत सार (गुण), आहे असा – बासरी) |

## कर्मधारयः

**अ. विशेषण-विशेष्य-कर्मधारयः**

**i. विशेषण पूर्वपद**
प्राचीन नगरी –
प्राचीना नगरी।

**ii. विशेषण उत्तरपद**
गुणविशेषः –
विशेषः गुणः।

**iii. विशेषण उभयपद**
धीरोदात्तः
धीरः च असौ उदात्तः च।

**iv. अन्यपदार्थदर्शक**
गुणान्तरम् –
अन्यः गुणः।

**ब. विशेषनाम-सामान्यनाम-कर्मधारयः**

भारतदेशः –
भारतः नाम देशः।
अयोध्यानगरी –
अयोध्या नाम नगरी।
कौस्तुभमणिः –
कौस्तुभः नाम मणिः।

**क. उपमान-उपमेय-कर्मधारयः**

**i. उपमान पूर्वपद**
घनश्यामः –
घनः इव श्यामः।
(उपमान) (उपमेय)

**ii. उपमान उत्तरपद**
पादपङ्कजः –
पादः पङ्कजम् इव।
(उपमान) (उपमेय)

**iii. रूपक-कर्मधारयः**
काव्यामृतम् –
काव्यम् एव अमृतम्।
(उपमेय) (उपमान)

**ड. प्रादि-कर्मधारयः**

प्राचार्यः –
प्रगतः आचार्यः।
सुभाषितम् –
सुष्ठु भाषितम्।
विज्ञानम् –
विशेषं ज्ञानम्।
विदेशाः –
विभिन्नाः देशाः।
दुर्जनः –
दुष्टः जनः।

**इ. मध्यमपदलोपी-कर्मधारयः**

मृत्प्रतिमाः –
मृन्निर्मिताः प्रतिमाः।
राजनीतिः –
राजविषयकी नीतिः।
तत्त्वज्ञानग्रन्थाः –
तत्त्वज्ञानविषयकाः ग्रन्थाः।

## बहुव्रीहिः

| समान-अधिकरण-बहुव्रीहिः | वि-अधिकरण-बहुव्रीहिः | प्रादि-बहुव्रीहिः | नञ्-बहुव्रीहिः | सह-बहुव्रीहिः | क्रियाविशेषण-सह-बहुव्रीहिः | अलुक्-बहुव्रीहिः |
|---|---|---|---|---|---|---|
| नीलकण्ठः –<br>नीलः कण्ठः यस्य सः।<br>↓ ↓<br>प्रथमा प्रथमा<br>एकवचन एकवचन | ईश्वरनिष्ठः<br>ईश्वरे निष्ठा यस्य सः।<br>↓ ↓<br>सप्तमी प्रथमा<br>एकवचन एकवचन | विमलः –<br>विगतः मलः यस्मात् सः।<br>निर्मलः –<br>निर्गतः मलः यस्मात् सः।<br>सुहृद् –<br>शोभनं हृदयं यस्य सः। | अधनः –<br>न विद्यते धनं यस्य सः।<br>अविद्यः –<br>न विद्यते विद्या यस्य सः। | सादरः –<br>आदरेण सह।<br>सोर्मि –<br>उर्मिभिः सह।<br>सकुटुम्बः –<br>कुटुम्बेन सह। | सादरम् –<br>आदरेण सह यथा स्यात् तथा।<br>सकुटुम्बम् –<br>कुटुम्बेन सह यथा स्यात् तथा।<br>सावेगम् –<br>आवेगेन सह यथा स्यात् तथा। | कण्ठेसर्पः –<br>कण्ठे सर्पः यस्य सः। |
| समान विभक्ती<br>∴ समानाधिकरण | वेगळी विभक्ती<br>∴ व्यधिकरण | | | | | |

## समस्तपदानां मेलनम् या कृतीसाठी महत्त्वाचे समास।

**समासा:।**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१. अव्ययीभाव:।** | | | | | | | |
| १. | प्रतिदिनम् | २. | यथाशक्ति | ३. | यथेष्टम् | | |
| **२. द्वन्द्व:।** | | | | | | | |
| १. | शान्तिसुखयो: | २. | नृत्यगीतवादनै: | ३. | देशाविदेशेभ्य: | ४. | श्रवणमनने |
| ५. | सुखदु:खयो: | ६. | छायातपौ | ७. | व्यक्ताव्यक्तम् | ८. | अहर्निशम् |
| **३. तत्पुरुष-समास:।** | | | | | | | |
| **I. नञ्-तत्पुरुष:।** | | | | | | | |
| १. | अस्वास्थ्यम् | २. | अनिच्छया | ३. | अनुपलब्धि: | ४. | अभद्रम् |
| ५. | अनभिज्ञ: | ६. | अनावश्यकम् | ७. | अश्रान्त: | ८. | अनार्येषु |
| ९. | अनिष्ठुरा | १०. | अनभिद्रोह: | ११. | अप्रिये | | |
| **II. उपपद-तत्पुरुष:।** | | | | | | | |
| १. | चिरजीवी | २. | शिल्पकार: | ३. | दु:खकरम् | ४. | दूरस्थ: |
| ५. | नृप: | ६. | द्विजरूपधृक् | ७. | पादपा: | ८. | देहज: |
| ९. | पुस्तकस्थानि | १०. | हितकर: | ११. | पारितोषिकार्हा: | १२. | भवभृताम् |
| **III. विभक्ति-तत्पुरुष:।** | | | | | | | |
| **i. द्वितीया।** | | | | | | | |
| १. | ग्रामागत: | २. | गुणातीतम् | ३. | अश्वारूढ: | | |
| **ii. तृतीया।** | | | | | | | |
| १. | निद्रापीडित: | २. | रूपहीनम् | ३. | निर्बन्धपृष्ट: | ४. | ओघहार्या |
| ५. | अनुशयान्वित: | ६. | त्यागसुरक्ता | ७. | क्षुत्पीडित: | ८. | महामान्य: |
| **iii. चतुर्थी।** | | | | | | | |
| १. | स्वग्रामोन्नत्यर्थम् | २. | उपस्कारार्थम् | ३ | तपोवनम् | | |
| **iv. पञ्चमी।** | | | | | | | |
| १. | इतरेतरम् | | | | | | |
| **v. षष्ठी।** | | | | | | | |
| १. | सूर्यप्रकाश: | २. | ऊर्जासाधनानि | ३. | राष्ट्रोन्नति: | ४. | पर्णाविशेषात् |
| ५. | तन्मन: | ६. | प्रतिमानिर्माणकार्ये | ७. | ग्रामभूषणम् | ८. | गणप्रमुख: |
| ९. | आत्मपरिचय: | १०. | स्वगृहम् | ११. | जनप्रमुख: | १२. | कशाघातै: |
| १३. | नयनपथम् | १४. | मानवहिताय | १५. | शक्तिपूजनम् | १६. | देवतापूजनम् |
| १७. | विचारमाला | १८. | शशविषाणेच्छा | १९. | विद्यासिद्धये | २०. | चित्रकल्पना |
| २१. | कीर्तिकथा: | २२. | स्वशोणितेन | २३. | राष्ट्रध्वज: | २४. | वैज्ञानिकयश: |
| २५. | क्षितीश: | २६. | पुण्यचय: | २७. | रत्नाकर: | २८. | कवीश्वराणाम् |
| २९. | सुखाकर: | ३०. | उमासुत: | ३१. | भवद्गुणा | ३२. | लिपिन्यास: |
| ३३. | चित्ताकर्षकम् | ३४. | ज्ञानलालसा (चतुर्थी सुद्धा) | ३५. | निवासस्थानम् (चतुर्थी सुद्धा) | | |
| **vi. सप्तमी।** | | | | | | | |
| १. | उद्योगव्यग्र: | २. | स्वराष्ट्रानुरागी | ३. | चिन्तनमग्न: | | |

## ४. कर्मधारयः।

### I. विशेषनाम-सामान्यनाम-संबंधः।

| | |
|---|---|
| १. | दुर्गादेव्याः |

### II. विशेषण-विशेष्य-संबंधः।

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शीतलजलम् | २. | सात्विकभोजनम् | ३. | कृष्णाङ्गाराः | ४. | कृष्णसुवर्णम् |
| ५. | प्रज्वलिताग्नेः | ६. | जीर्णकुटीम् | ७. | दैन्यावस्थाम् | ८. | अकिञ्चनच्छात्राः |
| ९. | विविधवर्णैः | १०. | शीतर्तौ | ११. | नवरसाः | १२. | विविधसमस्याः |
| १३. | क्षुद्रवस्तु | १४. | नूतनचीवराणि | १५. | बालनरेन्द्रः | १६. | हरिताभा |
| १७. | हरितक्रान्तिः | १८. | अश्रुपूर्णनयनाभ्याम् | १९. | रसिकजनाः | २०. | कषायवर्णः |
| २१. | पक्षिविशेषाः | २२. | व्यक्ताव्यक्तम् | २३. | महाप्रयासः | २४. | महाश्रयः |
| २५. | महावृक्षाः | २६. | महोत्सवाः | २७. | महाक्रान्तिः | २८. | महाजालम् |
| २९. | महाभूतानि | | | | | | |

### III. नित्य-कर्मधारयः।

| | |
|---|---|
| १. | देशान्तरात् |

### IV. उपमान-उपमेय-संबंधः।

| | |
|---|---|
| १. | मातृभूः |

### V. रूपकः।

| | |
|---|---|
| १. | अम्बराङ्गणे |

### VI. प्रादिः।

| | |
|---|---|
| १. | सुनिश्चितम् |

### VII. मध्यमपदलोपी।

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नाट्यरसान् | २. | नाट्यशास्त्रम् | ३. | अणुशास्त्रम् | ४. | कल्पवृक्षः |
| ५. | मृत्प्रतिमा | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **५. बहुव्रीहि-समासः।** | | | | | | | |
| **I. नञ्-बहुव्रीहिः।** | | | | | | | |
| १. | अनर्घः | २. | अक्षया | ३. | अधनाः | ४. | अमूल्यम् |
| ५. | अनक्षरः | ६. | अहितः | | | | |
| **II. प्रादि-बहुव्रीहिः।** | | | | | | | |
| १. | निरक्षरः | २. | निर्लोभाः | | | | |
| **III. सह-बहुव्रीहिः।** | | | | | | | |
| १. | सोर्मिणि | | | | | | |
| **IV. क्रियाविशेषण-सह-बहुव्रीहिः।** | | | | | | | |
| १. | सहर्षम् | २. | सानन्दम् | ३. | सादरम् | ४. | सत्वरम् |
| ५. | सोल्लासम् | ६. | सकौतुकम् | | | | |
| **V. समानाधिकरण-बहुव्रीहिः।** | | | | | | | |
| १. | बद्धाञ्जलिः | २. | ख्यातकीर्तस्य | ३. | चमसचञ्चूः | ४. | रक्तपक्षः |
| ५. | तपोधनः | ६. | प्रसन्नचित्तः | ७. | महोदयः | ८. | मुक्तमौनः |
| ९. | विचारशीलः | १०. | मलिकाभिधानः | ११. | उदारचेताः | १२. | पक्षिमित्रैः |
| १३. | पक्षिमित्राः | १४. | आश्रितोग्रतपसः | १५. | द्विजच्छद्मा | १६. | कुधियाम् |
| **VI. व्याधिकरण-बहुव्रीहिः।** | | | | | | | |
| १. | गजाननः | | | | | | |